# प्रकरण चौथे

## अनंत काणेकरांच्या " निळे डोंगर तांबडी माती " पुस्तकाचा अभ्यास -

# प्रकरण चौथे

## अनंत काणेकरांच्या " निळे डोंगर तांबडी माती " पुस्तकाचा अभ्यास --

### उपद्घात -

" निळे डोंगर तांबडी माती " हे प्रा. काणेकरांनी चित्रकार दलाला-बरोबर केलेल्या दक्षिण भारताच्या प्रवासावर आधारित असे सचित्र प्रवास वर्णन दक्षिणेतील निसर्ग, दक्षिणेतील देवालये, प्राचीनता ऐतिहासिकता आचार-विचार ,पेहराव ,धर्मानुभाव, चित्रशिल्पादिंची शब्दचित्रे या सर्वांतून काणेकरांच्या समृध्द व्यक्तिमत्त्वाच्या अविष्कार कोणकोणत्या स्वरूपात झाला आहे याचा आपणास अभ्यास करावयाचा आहे." भारताच्या विविधतेचे त्यांनी जितक्या उत्कंठतेने व कुतूहलाने दर्शन घेतले , तितक्याच सहजतेने त्यांनी या प्रवासाचे शब्दचित्र साकार केले आहे. दलालांची रेखाचित्रे आणि काणेकरांची शब्दचित्रे एकजीव झालेली दिसतात.

### दक्षिणेतील निसर्ग -

" निळे डोंगर तांबडी माती " या लेखनाची सुरवातच अतिशच चित्रमयी आहे "... पहाव तिथ निळे डोंगर आणि पायाखाली तांबडी माती आकाश जस गडद निळ तशीच इथली मातीही तांबडीलाल सरळ स्वच्छ ,सुर्यप्रकाशामुळे की काय इथल्या निसर्गाचे सर्व रंग कसे ठसठशीत दिसतात. एखादा नवमतवादी चित्रकार इकडची वनश्री रंगवायची असल्यास वर एक निळा पट्टा मध्ये एक गडद हिरवा आणि खाली एक तांबडा पट्टा आपल्या फलकावर ओढील,म्हणून दक्षिण भारत म्हटल की डोळ्यापुढ उभी राहतात, निळे डोंगर तांबडी माती। ( पृ.५) निळे डोंगर तांबडी माती ) काणेकरांचे पुस्तक त्यांच्या नावापासून मोठे वैशिष्ट्यपूर्ण

आहे. या " नावामध्येच काव्य असल्याची प्रतीती आल्याशिवाय राहात नाही"[२] या दृष्टीने या पुस्तकाचे प्रास्ताविक महत्वाचे वाटते. काणेकराना निसर्गातील रंगसंगतीचे खास आकर्षण आहे. दक्षिणेतील डोळ्यात भरणाऱ्या रंगाचे बहारदार शब्दचित्र रेखाटले आहे. उदा. उटी कुन्नूर, कोडाइकनाल, टू पिलार रॉक्स इ.चे ठिकाणचे निसर्गातील कलात्मकता ते टिपतात

उदकमंडल ( उटी )--

गुडलूर पासून उटी फक्त तीस मैल आहे, वळणे घेत, हा तीस मैलाचा घाट चढत बस वर जाते, खाली पसरलेल्या काळसर हिरव्या जंगलानी भरलेल्या भयानक दऱ्याकडे कडयावरून नजर टाकली की पोटात भीतीचा गोळा उठतो। या तीस मैलांत रस्त्याच्या दोन्ही बाजूला दिसणारा जंगलाचा देखावा अविस्मरणीय आहे. " ताडमाडापेक्षाही उंच उंच आणि सरळ सोट पाइनची किंवा रबराची झाडे पलटणीतले शिपाई कवायतीकरिता रांगामागे रागा करून ताठ उभे रहावेत तशी दिसतात, वर निमुळता होत गेलेला पाइनच्या पानांचा डेरा उत्तुंग देवळाप्रमाणे दिसतो, तर एखादया सहस्त्र हस्त माणूस वर हात करून उभा राहावा तशी वर फांदया वळलेली रबराची झाडे दिसतात" ( पृ.४८ निळे डोंगर तांबडी माती ) उदकमंडल हे नाव सार्थ करून दाखवण्याकरिता की काय झळझळीत निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर रूपेरी ढग पर्वतशिखराच्या भोवती घुटमळत असलेले दिसते" इतक्या उंचीवर कांही रूपेरी ढग इतके जवळ डोळ्यांसमोर दिसतात की असाच एखादा ढग आपल्याकडे पाहतो आहे असे कुठे तरी कालिदासाला वाटले असावे आणि ढगाला आपल्या काव्यात मुख्यभूमिका देण्याची कल्पना त्याला सुचली असावी। " ( पृ.४९ निळे डोंगर तांबडी माती )

उटीतील तळे --

नौकाविहाराची सोय असलेले गर्द झाडीने वेढलेले उटीचे तळे लांबवर पसरले आहे. या तळ्याच्या वर उंच देवदाराच्या जंगलात बडोदयाच्या महाराजांचा राजवाडा आहे. पलीकडे म्हैसूरच्या महारांचा राजवाडा आहे. " या राजवाड्यातल्या कलापूर्ण

4



आकृति करून लावलेल्या रंगीबेरंगी फुलझाडांच्या विस्तीर्ण बागा पाहिल्या की नंदनवन असेच असेल काय असे वाटू लागते ( पृ.५० ) वाघ, हत्ती, वगैरेंच्या शिकारीकरिता या निलगिरीत म्हैसूरच्या महाराजाचे एक खाजगी जंगल आहे म्हणे!

उटीतील स्वच्छ ऊन व थंडी -

इंग्लंडमध्ये आकाश सदा ढगाळ असल्यामुळे काळोखी वाटते - इथे स्वच्छ सोनेरी ऊन आहे पण " दुपारी कुडकुडायला लावणारी थंडी, उंच उंच वृक्षांची झाडी घरावरची धुराडी, टुमदार ख्रिस्ती मंदिरे, हिरव्या छपराची इंग्लिश पध्दतीची तांबड्या विटाची घरे वगैरे पाहून केंब्रिज सारख्या एखाद्या छोटेखानी इंग्लिश शहरात किंवा लंडनच्या निवांत हॅम्पस्टेड विभागात आपण फिरतो आहोत असे वाटते ( पृ.४९ )

साहेबांची उटी -

साहेब लोकानीच उटी गाव वसवलेले असल्यामुळे मोठ मोठया रस्त्याची चेअरिंग क्रॉससारखी नावेही इंग्लंडचीच आठवण करून देतात.

इथे असलेले गाई बैलही पांढ-या काळ्या रंगाच्या केसाळ कातडीचे वशिंड नसलेल्या सपाट पाठीचे आणि इंग्लिश गुराप्रमाणेच टवकारलेल्या आखूड शिंगाचे आहेत.

काणेकरांचा मनपिंड हा कविमनाचा असल्याने निसर्गातील काव्यही तितक्याच सूक्ष्म रितीने टिपतात, आस्वादतात याचे प्रत्यंतर येते.

कुन्नूर -

उटीजवळच कुन्नूर हे एक थंड हवेचे ठिकाण . उटी सोडल्यानंतर कुन्नूर पासून गाडी घाट-उतरू लागते " तीन हजार फूट उंचीच्या बोरघाटाची सात साडेसात हजार फूट उंचीच्या या निलगिरीतल्या घाटाशी तुलनाच होऊ शकत नाही"(पृ.५५)

उटी सात हजार दोनशें पंचाहत्तर फूट उंचीवर आहे. तर कुन्नूर पाच हजार सहाशे सोळा फूट उंचीवर आहे. मध्ये वेगवेगळ्या उंचीवर तीन चार ठिकाणे आहेत.

आगगाडी-

निलगिरीच्या या प्रचंड द-यात साधी आगगाडी उतरून जाणेच शक्यच नाही. इथे फ्युनिक्युलर रेल्वे आहे दोन रूळांच्या मध्ये एक दाते असलेला तिसरा रूळ असतो, इंजिनच्या दोन बाजूंच्या चाकांच्या मधोमध त्या रूळाच्या दात्यात दात अडकविलेले आणखी एक चाक असते, चढताना किंवा उतरताना गाडी घसरू लागली तर इतर चाकाना साधा ब्रेक लावता येईलच पण हे मधले चाक त्या मधल्या रूळात कोणत्याही क्षणाला घट्ट करता येईल.

खालचे कुन्नूर आणि वरचे कुन्नूर -

कुन्नूर चे असे दोन भाग आहेत .खालचे गावठी कुन्नूर आणि वरचे साहेबाचे कुन्नूर खाली बाजार व इतर घराची गर्दी आहे. वरती बाबा ,बंगले , इन्स्टिट्यूट वगैरे आहेत.

सिम्स पार्क -

ही पार्क म्हणजे एक व्यवस्थित ठेवलेले जंगलच आहे म्हटले तरी चालेल.

उटीच्या " फ्लॉवर शो " मध्ये असलेल्या नानारंगी फुलझाडासारखी अनेक फुलझाडे या पार्क मध्ये आहेत." मुली कानांत डूल घालतात तशा आकाराची तांबडी फुले हि-यांच्या कुंड्यासारखी सफेत नाजूक फुले, कमळासारखी अजस्त्र फुले नाना प्रकारची फुले इथे आहेत " ( पृ. ५७ )

ऑस्ट्रेलिया, चीन, कॉलिफोर्निया वगैरे नाना प्रदेशातून आणलेले वृक्ष इथे लावले आहेत.

कोडाइकनाल -

उटीचा घाट चढताना आजूबाजूच्या द-याखो-याचे जसे भव्य दर्शन होते तसे कोडीला होत नाही. " चार हजार फूट उंचीवर आल्यावर कांही ठिकाणी

केळीची दाट बने दिसली. सहा हजार फूट उंचीवर आल्यावर थंडी वाजू लागते " काही ठिकाणी आम्ही चढून आलेल्या रस्त्यावर खाली ढग रेंगाळताना दिसत होते. आता हवा थंड, ढगाळ " इंग्लिश " झाली होती " ( पृ. ११० )

टू पिलार रॉक्स -

काळेकभिन्न तुटलेले कडेच कडे आणि समोर एक विशाल दरी पसरलेली आहे. दरीच्या एका बाजूला दोन काळेकभिन्न अजस्त्र खडक उभे आहेत" पर्वताचा राजवाडा केला तर त्याच्या दरवाजाला लावलेले दोन प्रचंड स्तंभासारखे ते दिसत होते. " पिलार रॉक्स " हे नाव या खडकांना कुणी दिले ते अगदी यथार्थ आहे " ( पृ. ११३ )

दक्षिण भारतात प्रामुख्याने डोळ्यात भरणाऱ्या निसर्ग सौंदर्याचे काणेकरांनी इतके बहारदार शब्दचित्र रंगविले आहे की ते अक्षरशः डोळ्यासमोर तरळू लागते पण " काणेकराचे निसर्ग सौंदर्याचे प्रेम ह्या रंगसंगतीपुरतेच मर्यादित नाही"[3] तर झाडे, फुले व पक्षी ह्यांचाही मोठा वाटा आहे हे या पुस्तकातील ठिकठिकाणाच्या झाडे, पक्षी यांची वर्णने केली आहेत त्यावरून लक्षात येते.

या पुस्तकाचे शीर्षक ही जसे काव्यपूर्ण आहे तसेच निसर्गरूप आहे. या काव्यमय शीर्षकामागे काणेकराचे निसर्गप्रेमी मन आहे. या मनाच्या उत्कट अनुभूतीचे वर्णन काणेकरांना करावयाचे आहे. म्हणूनच दक्षिणेतील ठिकठिकाणाच्या गावातील , गावाजवळील प्रदेशातील डोंगर, माती, फुले, झाडे, ढग त्याचे आकार हे निसर्गातले घटक त्यानी आपल्या शीर्षकात गोवलेले आहेत.

सामाजिक परिस्थिती -

अनंत काणेकर हे प्रदेशातील चालीरीती निसर्ग याबरोबरच विविध संस्कारानी नटलेल्या माणसाचे दर्शन घडवतात. यामागे त्यांचा " मानवतावादी दृष्टिकोन " दिसून येतो. यामुळेच अदिवासी लोकाचे ते अगदी सहजपणे शब्दचित्र रेखाटतात .

आदिवासी -

उटीच्या आजूबाजूच्या डोंगरात इथल्या आदिवासी तोडाच्या ब-याच वसाहती आहेत. त्याना शिक्षण देऊन काही व्यवसाय शिकवण्याचा मद्रास सरकार प्रयत्न करते.

तोडा लोकांची केलेले विणकाम, सुतार काम, भरतकाम वगैरे एक " गिरी व्यवसाय " नांवाची पाटी असलेल्या दालनात होते. आपल्याकडच्या वारल्यासारखी किंवा कातक-यासारखी मळकट ,धुळकट कंगाल हे लोक दिसत नाहीत.

" वर्णाने उजळ,लांबट, लोंडाचे, बसक्या गालाचे पण चांगल्या सरळ नाकाचे आणि ठसठशीत मोठया डोळ्याचे हे लोक वाटतात. हनुवटया माठया आणि ओठ मात्र जरा पुढे आलेले पुरूष आणि स्त्रिया दोघांचेहि लांब काळे केस मानेवर लोंबत होते. स्त्रियांच्या केसांच्या मात्र कांही फॅशनेबल स्त्रिया अलीकडे करतात तशा सुरळ्या केलेल्या होत्या. पुरूष आणि स्त्रिया दोघांच्याहि अंगांभोवती मानेपासून पायापर्यन्त लोंबणारे एकच पांढरे वस्त्र गुंडाळलेले असते" ( पृ.५३ )

तोडा लोकांना कलाकुसरीची आवड आहे. बहुतेक पांढ-या वस्त्रांच्या किनारीवर काळ्या आणि पांढ-या सुताचे सुंदर कशीदाकाम केलेले असते. स्त्री-पुरूषांचा वेश एकाच त-हेचा आणि दोघांचेहि केस लांब असतात . पुरूषांना छोटया दाढीमिशा असतात त्यावरून ओळखता येते.

तोडांची वैशिष्टयपूर्ण झोपडी -

रेडइंडियनची विंग असते किवा एस्किमोची इग्लू असते तशीच तोडांची झोपडीही वैशिष्टयपूर्ण आकाराची असते. चाके काढून जमिनीवर ठेवलेल्या बंद बैलगाडी सारखी साधारणपणे दिसते. ती लांबी रूंदीही जवळजवळ तितकीच लाकडाच्या फळ्या गवताच्या जुड्या, चिखल आणि वेताच्या काठया मिळून ती केलेली असते. कलात्मक पध्दतीने लावलेल्या गवतामुळे या झोपडया सुबक दिसतात. सर्व बाजूनी बंद असलेल्या या झोपडीचे दार जमिनीला लागून अवघी दोन फूट रूंद आणि दोन फूट उंच असते,दार म्हणण्यापेक्षा त्याला झांकणाच म्हटलेले बरे। जमिनीवर उपडे पडून झोंपडीत सरपट

जायचे आत वस्तू तरी काय असतात ते पाहण्याकरिता कार्णेकर स्वत: पोटावर उपडा पडून आत सरपट गेले " एका कोप-यात मातीची चूल आणि पत्र्याचे चारपाच डबे होते. झोपण्याकरिता जमिनीपेक्षा वीतभार उंच मातीचा ओटा केलेला होता, मधून मधून भोके दिसत होती ती धूर बाहेर जाण्याकरिता किंवा हवा आत येण्याकरिता असतील! निलगिरीतल्या या उंचीवर युरोपसारखी थंड हवा असल्यामुळे एवढेसे दाराचे भोक ठेवून या सर्व बाजूनी बंद झोपडया तोडा करीत असावेत " ( पृ.५४ )

मल्याळी प्रदेश -
----------

शेतात काम करणा-या स्त्रिया-मुली नव्हे तरूण आणि म्हातारा-यासुध्दा खाली पांढरा परकर वर तसाच पांढरा पोलका किंवा कांहीच नाही। आणि कानांत वरच्या बाजूला सोन्याच्या जाड बाळ्या घातलेल्या दिसतात. घरांची छपरेही वेगळ्या घाटाची - चिनी घराची किंवा मंदिराची छपरे असतात. त्या प्रकारची होती एका कौलारू छपरावर दुसरे छोटे कौलारू छप्पर आणि या छोटया छपराच्या दोन्ही कडा मिशांचे आकडे वर वळवतात तशा वळलेल्या। बहुतेक घरांच्या आवाराच्या छोटया दरवाजावर सुध्दा लहानसे कौलारू छप्पर " कोचीन या नावातच नुसते चीन नाही तर या प्रदेशावर सयाम इंडोचीन वगैरे देशांप्रमाणेच चीनची दाट छाया पडलेली दिसते." ( पृ.६८ ) या चिनी छपराच्या काही घरांचे कोपरे लाल निळ्या, पिवळ्या रंगाच्या चौकोनानी सुशोभित केलेले दिसते. शेतातल्या काही स्त्री-पुरूषांच्या हातात लांब दांडयाच्या विणलेल्या वेताच्या छत्र्याही सयाम इंडोचीनच्या चित्रात दिसणा-या छत्र्यांचीच आठवण करून देतात.

अलेप्पी गाव -
---------

कोकणात घरासाठी भोके भोके असलेला लाल जांभा दगड वापरतात. तसलेच इकडच्या ही घराना वापरतात. छपरे चिनी छपराची आठवण करून देणारी.

हिंदू देवळांचे रूप पाहण्याच्या घरासारखी रस्त्यापासून देवळाच्या दारापर्यन्त दोन्ही बाजूना लाकडी खांब असलेला कौलारू छपराचा रस्ता देवळावरही घरासारखीच कौले आणि खोडयांतल्या घराना ओटयाभोवती लाकडी पट्टयांच्या चवकहीची भिंत घालतात.

अलेप्पीचा समुद्र किनारा -

हजारो माडांच्या हिरव्या झांवळ्यांची छत्राचामरे " त्या निळसर पांढ-या वाळूच्या अफाट विस्तारावर ढळत होती, आणि घासाघास आदळणा-या हिरवट लाटा पांढ-या शुभ्र फेसाचे हार किना-यावर फेकीत होत्या. मावळत्या सूर्याच्या तांबूस सोनेरी प्रकाशांत आकाशांत मध्येच कुठून तरी आलेल्या जांभळ्या ढगांच्या छाया समुद्राच्या पाण्यावर तरळत होत्या" ( पृ.८१ )

प्रवासवर्णन काराच्याअनुभावविश्वाचा आगळेपणा त्यातील प्रदेशाचा चालत्या बोलत्या चित्रणामुळे निर्माण होत असतो. प्रवासवर्णनातल्या " मी " ला प्रवास करणा-या " मी " च्या अवस्थेत जाऊन प्रवासाचे संस्कार अनुभावावे लागतात"[४] हे काणेकरानी तोडांची झोपडी पाहताना जो अनुभाव घेतला किंवा मल्याळी प्रदेशातील कौलारू छपर पाहिले इ. उदाहरणावरून प्रत्यय येतो.

अनंत काणेकर दक्षिणेतील निसर्ग व चित्रशिल्प स्थापत्य पाहून जेवढ्या आनंदाने ते नमूद करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात तसाच " निसर्ग सौंदर्याच्या आणि मानवी सौंदर्यकृतीच्या जवळपास आढळणा-या माणसांचा आपल्या मनावर उमटविलेले संस्कारहि ते नमूद करतात."[५]

सौजन्यशील माणसे -

म्हैसूर मधल्या माणसाचे एक वैशिष्टय जाणवले. चहाच्या हॉटेलात जा, मोठया स्टोअरमध्ये जा, बस-स्टँडवर किंवा स्टेशनात जा, इथली सामान्य माणसे आमच्याकडच्या किंवा उत्तर भारतातल्या माणसापेक्षा किती तरी सौजन्यशील आणि सज्जन वाटतात. काणेकर म्हणतात " हे सौजन्य ओढून ताणून आणलेले नाही. अगदी स्वाभाविक वाटते ते परक्याशी बोलताना "सर" म्हटल्याशिवाय. इथला माणूस वाक्य पुरे करीत नाही.

काणेकर "चंद्रलेखा कॅफे मध्ये कॉफी ध्यायला गेले असता तिथल्या " वेटरने कॉफी देता देता " युवर नेटिव्ह पेलसर " १ म्हणून मोठया आस्थेने चौकशी केली"( पृ.१४ )

लेखक कोईमतूर येथील " मुरूगन कॅफे"त जेवायला आले होते. हॉटेलच्या हॉलमध्ये जेवायला बसले असताना दलाल हॉटेलचा नोकर समजून ओरडले होते तो माणूस त्यांच्यासारखाच हॉटेलात उतरलेला उतारू होता " इकडची माणसे फार सौजन्यशील म्हणून आम्हाला उलटी तंबी न देता तो बिचारा तिथून निसटून हॉटेलच्या मॅनेजरकडे गेला आणि आमची तक्रार काय आहे ती पाहण्याकरिता त्याला त्याने पाठवून दिले " ( पृ.६२ )

हाडाचीच सज्जन माणसे -

लेखक त्रिचनापल्लीला होते तिथून त्याना पॉंदिचेरीला जायचे होते पण त्याना कलेक्टरचे सर्टिफिकेट घेतल्याशिवाय पॉंदिचेरीला जाता येणार नाही हे समजले. कलेक्टराची कचेरी म्हणजे एवढयाशा कामासाठी दोन तीन दिवस रखडावे लागेल, उगाच इकडून तिकडे फिरायला सांगणारे उडवा उडवी करणारे कारकून भेटतील असे लेखकाला वाटत होते, पण तिथल्या कारकुनाने "मॅजिस्ट्रेट साहेब यायला वेळ आहे, तोपर्यन्त अमके अमके कागद तयार करावे लागतील ते मी करून ठेवतो " ( पृ.११८ ) अस सांगून बसायला खुर्च्या दिल्या.

मॅजिस्ट्रेटसाहेब आल्यानंतर लेखक स्वत: आत गेल्यावर मॅजिस्ट्रेटनी "हतिच्या हेच म्हणून त्यानी ताबडतोब सह्या करून कागदपत्र शिक्के मारण्याकरिता शिपायाकडे दिले " ( पृ.११९ ) कशाकरिता पॉंदिचेरीला जाता वगैरे चौकशी त्याने केली लेखक चित्रकार आहेत हे कळल्यावर आनंद व्यक्त केला(पृ.११९)

कानडी लोकांचा भलेपणा -

म्हैसूर ला जाताना दुस-या वर्गाच्या डब्यात बरीच गर्दी असते पण इथल्या उतारूचे वर्तन आमच्याकडल्याच्या उलट दिसते,उगाच ऐसपैस जागा अडवून नवीन येणारांना"इथे जागा नाही " म्हणून गुरकावण्याऐवजी शांतपणे एकमेकाना जागा करून देण्याचीच प्रवृत्ति दिसली.

एक कुटुंबवत्सल कानडी गृहस्थ बायकोमुलासह एका बाकावर बसला होता " त्याची मुले डबा उघडून कांही खात होती. बाकीची बाके भारलेली होती.आम्ही

आत गेल्याबरोबर " माफ करा हं " एका मिनिटात हे डबे वगैरे बाजूला करून तुम्हाला जागा करून देतो " असे म्हणून त्याने मुलांना घाई करायला सुरवात केली"(पृ.२७)

हे पाहून लेखकाला वाटले आमच्याही देशात निदान या बाजूला तरी युरोपइतकेच या बाबतीत सुधारलेले लोक आहेत हे पाहून बरे वाटले.

दक्षिणेतील आतिथ्य -

कोईमतुरात लेखक फॉरेस्ट कॉलेजामध्येच म्हैसूर सरकारचे पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांच्या मेसमध्ये जेवायला होते म्हैसूरसरकारनी लहानसे भाषण करून मेसमधल्या विद्यार्थ्यांना यांची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी आपुलकीने बसवून घेतले व त्याना मांसाहारी आणि शाकाहारी दोन्ही पध्दतीचे जेवण मिळाले, ते पाहून लेखक म्हणतात " दोन घरचापाहुणा उपाशी ही म्हण महाराष्ट्रात खरी असेल पण आतिथ्यशील दक्षिण भारतात उलट प्रकार दिसतो".(पृ.६५ )

वरील अनेक उदाहरणावरून असे म्हणता येईल काणेकर जीवनाच्या विविध क्षेत्रात वावरत असल्यामुळे त्यांना समाजाच्या अगदी खालच्या थरापासून वरच्या थरापर्यन्तच्या माणसांची चांगलीच ओळख झाली आहे.

कुर्गी स्त्री-पुरूषांचा वेष -

पुरूष लुंगीसारखी गोल धोतर गुंडाळतात, वर कोट घालतात आणि हिरव्या किंवा तांबडया रेशाचे पांढरे फडके अरबांसारखी डोक्याला बांधतात.

बायका आपल्या पातळाचा पदर खांद्यावरून न घेता संन्याशाच्या छटीसारखा दोन्ही बगलांतून मागे घेऊन गांठ मारून किंवा पिनने कुर्गी स्त्रिया अडकवतात. मनगटापर्यन्त लांब हाताचे पोलके घालतात आणि डोक्याला पुरूषांच्या-सारखेच मागे शेमला सोडलेले फडके बांधतात.

लहान मुली जिप्सी बायांप्रमाणेच लाल किंवा हिरवा , पिवळा लेहेंगा, वर लांब हाताचा सदरा आणि डोक्याला फडके बांधतात.

म्हाता-या कुर्गी बायका पांढरे पातळ आणि डोक्याला पांढरेच फडके बांधलेल्या दिसतात. तरूण स्त्रिया आपल्या स्त्रियांच्या सारखीच रंगीबेरंगी पातळे पण कुर्गी पध्दतीने नेसलेल्या आणि डोक्याला रंगीबेरंगी फडके बांधलेल्या होत्या.

"श्रीमंत कुर्गी स्त्रिया सोनेरी जरतारीचे भरत काम केलेले रंगीत रेशमी फडके डोक्याला बांधलेल्या भारजरी उंची रंगीत पातळातल्या कांही गो-यापान स्त्रिया आहेत" ( पृ. ४४ )

<u>मल्याळी स्त्रियांचा वेष -</u>

कमरेला गुंडाळलेले इथल्या स्त्रियांचे फडके रंगीबेरंगी नसते. पांढरे असते. "ब-याच स्त्रिया असले पांढरे फडके कमरेला वर पांढरे पोलके आणि क्वचित त्यावर शालीसारखी एक पांढरेच फडके खांद्यावरून घेतलेले अशा वेषात होत्या"(पृ.७७)

बहुतेकांच्या कानात वरच्या बाजूला सोन्याची जाड बाळी आणि कानाच्या पाळीत सोंगट्यासारख्या चार-पाच सोन्याच्या चौकोनी तुकड्यांचा कान "फाटण्या - इतक्या वजनाचा घोस घालतात हे एक विचित्र कर्ण भूषण इथे दिसते"(पृ.७७)

हा वेश घालणा-या ही कर्णभूषणे वापरणा-या किंवा " वक्ष उघडे टाकून फिरणा-या या स्त्रिया खालच्या वर्गातील असाव्यात"( पृ.७७ )

<u>केरळीय वेष -</u>

"केरळीया स्त्रिया प्रमाणेच पुरूषांना ही सर्रास पांढ-या कापडाची आवड आहे " ( पृ.७७ )

म्हैसूरमधल्या कानडी किंवा कोईमतूर मधल्या तमिळ पुरूषांसारखीच इथलेही पुरूष धोतर गोल गुंडाळतात, वर एक शर्ट घालतात आणि "बहुधा अनवाणी चालतात" ( पृ. ७७ )

बहुतेक पुरूषांची धोतरे किंवा शर्टस पांढ-या शुभ्र परीट घडीची असतात. खांद्यावर चापून चोपून इस्त्री केलेले जरीकाठी उपरणे असते.

कानडी-तामिळ स्त्रिया --

कानडी किंवा तामिळ स्त्रिया किंचित वेगळ्या पध्दतीने पण " आपल्या इथल्या बायकांसारखीच रंगीत लुगडी वापरतात ,पांढरे कापड वापरणा-या इथल्या स्त्रियांची वेशभूषा एकदम वेगळी असली तरी इथले " जेवणे खाणे कानडी तामिळ पध्दतीचेच म्हणजे सकाळी इडली दोशी आणि दुपारी सांबार-भात,पापड वगैरे दिसते" ( पृ.७८ )

मल्याळी पुरूष --

स्वच्छ पांढरा शर्ट, स्वच्छ परीट घडीचे गोल धोतर आणि एक रेशमी काळी आणि एक सोनेरी जरीची रेघ असलेल्या किनारीच्या स्वच्छ पांढ-या उपरण्याची खाद्यांवर घडी अशा वेशातले बरेच पुरूष दिसतात.

कपडे उंची आणि स्वच्छ पण पायात मात्र काहीच नाही " गोल धोतरा-वरच्या पांढ-या शर्टाला कांहीनी टाय लावलेलाही दिसला" ( पृ.८३ )

दक्षिणेतील देवालये --

धार्मिक श्रध्दा हे भारतीय जीवनाचे एक महत्वाचे अंग आहे. त्यामुळे भारतीयशिल्पाकृतीची निर्मिती ही बहुतांशी धार्मिक दृष्टीने निर्माण झालेली आहे. शिल्पकलेचे वैशिष्टय म्हणजे ती नि:सीम श्रध्देच्या पोटी निर्माण झालेली असते. त्यामुळेच त्यात अलौकिकता येते " कोणत्याही कलेत जर श्रध्दा नसेल तर ती रसहीन ठरते "[६] याचा प्रत्यय आपल्याला काणेकरानी दक्षिणेतील देवालयाचे जे वर्णन केले आहे त्यावरून लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

कावेरी मातेची भाव्य मूर्ति -

धारणांला लागून उंच दगडी कमानीत उभी असलेली काळ्या दगडाची " श्रीकावेरी मातेची भाव्य मूर्ति किती तरी वेळ पाहात राहण्यासारखी आहे" ( पृ. ३३ ) चार हातांची रूबाबदार, रेखीव मूर्ति आहे. पुढल्या दोन हातात एक घट आहे. घाटांतून पाण्याची धार सतत पडत असते. मुर्तिच्या पायांशी पादुका कोरल्या आहेत. त्यावर लोक भाक्तिभावाने गुंधफुले वाहतात.

चामुंडी देवी -

म्हैसूरमधली चामुंडी टेकडी आणि या " चामुंडी हिल " वरले राज - घराण्याची कुलदेवता चामुंडीदेवी हिचे देऊळ सुप्रसिध्द आहे.

"तांबडी लाल जीभ, पिवळा देह, काळ्याभोर मिशा असलेला दहा-बारा फूट उंचीचा, एका हातात एक लांबलचक साप आणि एकांत भाले मोठे नागवे खड्:ग घेतलेला महिषासुराचा प्रचंड पुतळा " ( पृ.३८ )

पायथ्यापासून थेट वर देवळापर्यन्त मोटारीचा रस्ता आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला विजेच्या दिव्याचे खांब आहेत. टेकडीवर सगळीकडे ठिकठिकाणी विजेचे दिवे आहेत " रात्री हे दिवे लखलखू लागले की ही टेकडी म्हणजे सोन्याच्या पिना खोचून ठेवण्याची परमेश्वराची एकादी अजस्त्र " पिन कुशन " आहे की काय असे वाटते " ( पृ. ३७ )

संस्थानात लोकप्रतिनिधींचे मंत्रिमंडळ आलेले असले तरी या देवालयाची व्यवस्था राजघराण्याकडेच आहे. राजेराण्याच्या आधी कुणालाही दर्शन घेऊ देत नाहीत.

पदमनाभ देवालय -

हे त्रावणकोर राजघराण्याचे कुलदैवत आहे. श्री पदमनाभ मंदिराचे उंच गोपुर डोंगरासारखे भाव्य आहे. किल्ल्याच्या बुरूजांसारखे दोन उंच मनोरे मुख्य द्वारापाशी आहेत. आतल्या प्रशस्त प्राकराभोवती तटबंदी सारख्या भाव्य भिंती

आहेत. आत किती तरी रस्ते ,इमारती, दुकाने आहेत. दोन पुष्करिण्णी दोन बाजूला आहेत.

"इथली देवालये म्हणजे एक लहानसा गांवच असतो. केळी, "महाबळ " म्हणजे आंबे, फुलाचे हार वगैरेची दुकाने हारोने होती. इथल्या फुलांच्या हाराचे एक वैशिष्टय म्हणजे अंतरा अंतरावर हारात शोभेकरिता लिंबे गुंफलेली असतात"(पृ. ८७)

कन्याकुमारीची मूर्ति --

या गाभा-याच्या कमानदार दारावर खालपासून वरपर्यन्त दोन्ही बाजूनी " एकावर एक रांगेने पणत्या लावल्या होत्या. लालसर ,पिवळ्या ज्योतीच्या त्या कमानीतून कन्याकुमारीची रेखीव मूर्ति लखलखत होती" ( पृ. ९७ ) जरीकाठी लाल रेशमी परकर चोळी आणि डोक्यावर सोन्याचा मुकूट आहे.

"विवाहापूर्वी तपस्येकरिता पार्वती इथे आली म्हणूनच की काय कन्येच्या हातात एक रूद्राक्षाची जपमाळ आहे " ) पृ.९७ ) नाकात मद्रासी बायकांसारखी दोन बाजूना दोन ठसठशीत हिरे आणि कपाळावर मधोमध एक मोठा हिरा लखलखत होता.

रामेश्वराचे मंदिर -

रांगेने सात कळस असलेले रामेश्वराचे मुख्य गोपूर खूप उंच आणि मोठे आहे. उजव्या बाजूला , अलीकडे पलीकडे कोरीव काम केलेल्या तीन तीन भव्य दगडी खांबांच्या नजर पोहोचत नाही इतक्या लांब रांगा आहेत. त्याना " प्रदक्षिणा " म्हणतात अशा चार प्रदक्षिणा मिळून चार हजारावर असे खांब आहेत,म्हणे ( पृ.१०३ )

रामेश्वर किंवा या बाजूची इतर देवालये काय, लहान देवळे, दुकाने मिळून ते एक गजबजलेले गावच असते " ( पृ. १०३ ) पश्चिम प्रदक्षिणेतल्या खांबाच्या एका रांगेत दोन्ही बाजूना खेळणी, शिंपले , शंख वगैरेची दुकाने आहेत. खांबावर कोरलेल्या प्रतिमा चांगल्या आहेत.

देवाची पालखी फिरते तेव्हा वरून पुष्पवर्षाव करण्याकरिता छताला ठिकठिकाणी लाकडी अप्सरा लावून दोरी ओढली की त्यांच्या हातातल्या टोपलीतली फुले पालखीवर पडतील अशी व्यवस्था केली आहे.

देव आंघोळीला येतात -

"आसपास चोवीस कुंड आहेत, मध्ये सेतुमाधव कुंड आहे, या कुंडात देव संध्याकाळी आंघोळीला येतात ( पृ. १०४ ) देवालयाच्या मागे समुद्रकाठी अग्निकुंड आहे. गावात लक्ष्मण कुंड आहे हे एखाद्या मोठ्या पुष्करिणीसारखे आहे. कांही अंतरावर सीताकुंड आहे.

मीनाक्षीचे मंदिर -

शिल्पकला आणि रंगकाम याचे सौंदर्य मीनाक्षीच्या मंदिरात असलेल्या गोपुरावरून लक्षात येते.

या देवालयाला पूर्व,पश्चिम, दक्षिण,उत्तर अशी चार डोंगरासारखी प्रचंड गोपुरे आहेत. त्याशिवाय आंत लहान लहान आठ गोपुरे आहेत. पश्चिम गोपुरावरले कोरीव काम विशेषच सुंदर आहे. खालपासून वर पर्यन्त चारही बाजूनी पुराणातल्या अनेक कथा शिल्पकाराने शेंकडों लहान मोठ्या प्रतिमांच्या सहाय्याने कोरल्या आहेत. " मजल्या मजल्यावर कोरलेली प्रत्येक कथा पाहायची म्हणजे दुर्बिण घेऊन इथे रोज पंधरा दिवस तरी नेमाने सात आठ तास उभे राहिले पाहिजे (पृ. १०९ )

मदुरा - मीनाक्षीच्या देवालयाचे वैशिष्ट्य म्हणजे ही चार अचाट गोपुरे.

गाभारा-

गाभाऱ्यात काळ्या दगडाची देवीची मूर्ति आहे. हातपाय सोन्याचे मढवलेले आहेत. एका हातावर पोपट बसलेला आहे " पोपट हा मीनाक्षीचा आवडता पक्षी म्हणून की गाभाऱ्याच्या शेजारीच असलेल्या भल्यामोठ्या पिंजऱ्यासारख्या दालनात भक्तांनी देवीला वाहिलेले अनेक जिवंत पोपट दृष्टीस पडतात"(पृ. १०९ )

आवारात किती तरी इतर मंदिरे आहेत. एका दगडातून कोरलेली नंदी आणि त्याचे मखार आहे. सुब्रम्हण्यमचे मंदिर आहे. गणेशाचे मंदिर आहे. खांबाखांबावर अर्धनारी नटेश्वर वगैरे प्रतिमा कोरलेल्या आहेत.

"दक्षिण गोपूराजवळ असलेल्या दगडी खांबावर थाप मारली की टण टण टण असे वेगवेगळे सप्तस्वर निघातात"( पृ. ११० )

श्रीरंगम देवालय -

श्रीरंगम या गांवाला देवालय म्हणावे की या देवालयालाच गांव म्हणावे असा, संशय करण्याइतका श्रीरंगम देवालयाचा विस्तार आहे.

देवालयाचे आवार एकंदर आठ मैलाचे आहे. आंत घरे आहेत, गल्ल्या आहेत, बाजार आहेत. श्रीरंगाची मूर्ति आहे तिथून दोन फर्लांगांवर लक्ष्मीच्या मूर्तीचा गाभारा आहे.

"प्रवेशाव्दाराशी दोन प्रचंड दगडी खांब आहेत. आणि कमानीवर वैष्णवांच्या कपाळावर असतो तसा भला मोठा दहा-बारा फूट उंचीचा दोन पांढरे आणि मध्ये एक लाल असे पट्टे असलेला त्रिपुण्ड आहे. कमानीवर कोरलेल्या महिरपीवर विष्णूची निरनिराळी रूपें आहेत. आत गेल्यावर या अफाट देवालयात कुठे जायचे ते समजत नाही" ( पृ.११५ )

गरूड --

गाभा-यांत तांबडयालाल रंगाची एक गुडघा दुमडून एक गुडघा वर करून हात जोडुन बसलेली भीमसेनासारखी अचाट मूर्ति आहे. हाताला लांब नखे आहेत आणि तोंडातले दोन दांत सुळ्यांसारखे पुढे आलेले होते, नाक ही चोचेसारखे विशेष बांकदार आहे" हा कोण ? तर गरूड विष्णु समोर हात जोडून बसलेला (पृ.११५ ) गाभा-यात श्रीरंगाची मूर्ति आहे .देवालयाच्या आणि गरूडाच्या मूर्तिच्या मानाने श्रीरंगाची मूर्ति अगदीच लहान आहे.

शिव पार्वती मंदिर -

एकाच खडकांतून कोरलेल्या २७३ फूट उंच असलेल्या त्या प्रचंड मंदिराच्या पाय-या आहेत. खडकांत कोरलेले एक प्रशस्त दालन आहे हे पार्वतीचे मंदिर, आणखी वर गेल्यावर शिवमंदिर लागते. शिखरावरच्या निमुळत्या टोकावर गणेशाचे मंदिर आहे " या मंदिराच्या गच्चीत उभी राहिले की कुतुबमिनारावर उभी राहिल्यासारखी वाटते. तिथूनच खूप दूर कावेरी आणि काल्लडम नद्यांचा संगम दिसतो" ( पृ. ११६ )

या "शिवालया"भोवती इतर देवालयांच्या सारखा विस्तृत तट आहे. या तटाच्या आंतली घरे ,दुकाने, बाजार, रस्ते इतस्तत: पसरलेले वरून पाहताना मजा वाटते " ( पृ. ११६ )

बृहदीश्वराचे देवालय -

तंजावरांतले बृहदीश्वराचे देवालय हे दक्षिणेतील एक फार प्राचीन आणि प्रचंड देवालय आहे. देवालयाच्या तटाभोवती एक भला मोठा खंदक आहे. प्रवेश व्दारावरले प्रचंड गोपुर पाहून पुढे गेल्यावर एका उंच चौथ-यावर अवाढव्य नंदी बसलेला दिसतो. पुढे " मुख्य गाभा-यांत महादेवाची पिंडी आहे. ही अजस्त्र पिंडी पाहिल्यानंतर " बृहदीश्वर " हे नाव अगदी सार्थ वाटते" ( पृ. १२२ )

कुंभेश्वराचे देवालय -

कुंभेश्वराच्या गाभा-या पर्यन्त जावयाचे म्हणजे चांगल्या अर्ध्यापाऊण फर्लांग लांब दुकानांच्या रांगांमधून जावे लागते. देवालयाच्या आवारात गुलाल, बुक्का, हळद-कुंकू वगैरेची दुकाने आहेत. पुस्तके, भाजीपाला आणि लोखंडी सामानाचीही दुकाने आहेत.

सभा मडंपात कोरीव काम केलेले काळ्या दगडाचे खांब आहेत. संभोग शृंगाराची कांही दृश्ये इथ कोरली आहेत.

दक्षिणेतील प्राणी संग्रहालये --

म्हैसूरचे प्रख्यात प्राणीसंग्रहालय -

झू मधील वाघ, सिंह ठेवण्याची पध्दति मजेदार आहे. शेपन्नास फुटांवरून वाघ किंवा सिंह समोर उभे राहून पाहू शकता, मध्ये पिंजरा, गज काही नाही। एकदम कुणाला भिती वाटेल पण भीतीचे कांही कारण नाही. वाघ - सिंहाला राहण्याकरिता पिंजरे आहेतच. पण पिंज-याभोवतालच्या खडकाळ ,झाडेझुडपे असलेल्या प्रशस्त मोकळ्या जागेत ते स्वैरपणे फिरू शकतात आणि तुम्ही त्याना पाहू शकता भ्यायचे कारण नाही. तुमच्या आणि त्यांच्या-मध्ये एक किती तरी खोल आणि किती तरी रूंद असा खंदक असतो. त्याच्यावरून उडी मारणे त्याना शक्यच नसते . त्याचप्रमाणे मद्रासचा झू देखील पाहण्यासारखा आहे. इथेही म्हैसूर सारखेच खंदकाने वेढलेल्या उघडया जागेत फिरणारे वाघ-सिंह पाहता येतात.

गोल्डन फेजंट -

हा कोंबडयासारखा एक पक्षी मला कमालीचा सुंदर वाटला " ( पृ. २९ ) त्याच्या डोक्यावरचा तुरा ,त्याच्या पिसांचे सोनेरी लाल निळे रंग त्याच्या शेपटाचा पिवळसर तपकिरी झुपका, सर्व काही अद्भुतरम्य आहे.

व्दाररक्षक सिद्गौडा -

हा इथल्या पदार्थ संग्रहालयाच्या इमारतीचा व्दाररक्षक आहे. हा माणूस शरीराने अगडबंब असून सात फूट तीन इंच उंच आहे " झू मधले इतर प्राणी पाहण्याआधी यालाच पहात लोक बराच वेळ उभे राहतात" ( पृ. २९ )

अश्वशाला-

अनंत काणेकराना घोडा हे जनावर अतिशय आवडते आहे. "घोडा पहिला की त्याच्या अंगावरून हात फिरवण्याचा मला अनिवार मोह होतो .इथे या जन्माची हौस फिटली असेही ते म्हणतात ( पृ. ३० ) निळे डोंगर तांबडी माती)

या संग्रहालयात मखमली तपकिरी रंगाचे, आपादमस्तक ,दुधाळ पांढरे, शास्त्रापुराणांत सांगितलेली सर्व काळीपांढरी शुभ्र चिन्हे अंगावर असलेली बाकदार लांब मानेचे ,डौलदार उंच मानेचे किती तरी घोडे होते. प्रत्येकाचे नाव वर्णन वगैरे लावलेले होते.

पूजेचा घोडा-

पंढ्रापूरचा पांढरा घोडा, शुभ्र संगमरवराचा एकादा घोडयाचा पुतळा चालताहालता झाल्यासारखा दिसत होता" ( पृ. ३० )

या घोडयाला पूजेचा घोडा असेही म्हणतात. स्वत: महाराज विशिष्ट दिवशी पूजा करतात. एक घोडा पांढरा घोडा परिचारकाने खूण केल्यावर पाहुण्यांना नाचून दाखवतो। एक पुढले गुढघे टेकून डोके खाली करून पाहुण्यांना नम्रपणे अभिवादन करतो.

फील्ड मार्शल -

लॉर्ड वेव्हल ने म्हैसूरला भेट दिली तेव्हा रपेट करायला हा घोडा पसंत केला होता म्हणतात ( पृ. ३० ) अश्वशालेच्या प्रवेशव्दारा जवळच्या दालनात या घोडयाचे जे ट्रेनर होऊन गेले त्याचे प्लास्टरचे लहान लहान उभे पुतळे आहेत.

राजे लोकाचे वैभव -

एका भव्य दालनात महाराजांच्या नक्षीदार सोन्याच्या रूप्याच्या घोडयानी ओढायच्या गाडया आहेत.

एक चौकोनी बंद शिग्रामगाडी आहे. हिच्यात बसून महाराजांच्या मातोश्री चामुंडीदेवीच्या दर्शनाला जातात.

दुस-या एका दालनात राजेसाहेबांच्या मोटारी आहेत" एकाहून एक भव्य अशा हिरव्या , पिवळ्या,तांबडया, रूपेरी चकचकीत रोल्स रॉइस ,डेम्लर वगैरे किती तरी मोटार गाडया इथे होत्या "( पृ. ३१ )

चित्रशाळा -

एका प्रशस्त दालनाचे नांव रविवर्मा हॉल आहे. त्यात रविवर्म्यांची प्रख्यात चित्रे लावली आहेत. मत्स्यगंधा, जटायुवधा, देवकी कृष्ण भेट वगैरे चित्रांच्या मूळ प्रती इथे आहेत. एका चित्रात भारतातल्या निरनिराळ्या धर्मांच्या आणि निरनिराळ्या प्रांतातल्या स्त्रिया त्यांच्या विशिष्ट वेषांत रविवर्म्यांनी रंगविल्या आहेत.

रोअरिख् हॉल -

हिमालयाच्या प्रेमांत पडून प्रख्यात रशियन चित्रकार - निकोलय रोअरिच कित्येक वर्षे हिमालयातच वास्तव्य करीत होता. भडक निळसर, काळसर, हिरव्या लाल भडक रंगात त्याने रंगविलेली हिमालयाची चित्रे विख्यात आहेत " (पृ. त्यातही कांही या हॉलमध्ये पाहावयास मिळतात.

त्रिवेंद्रमचे म्युझियम -

किंचित डोंगरातल्या जागेत हे आहे. म्यूझिअमची इमारत छोटीच पण त्रावणकोरी कलाकुसरीचे वैशिष्टय असलेली ( पृ.८६) कोरीवकाम केलेल्या रंगीत लाकडी छताखालच्या तिरप्या खांबावर चिनी ड्रॅगनसारख्या सर्पाकृती कोरल्या आहेत. बारीक नक्षीकाम केलेल्या चांदीसोन्याच्या आणि हस्तिदंताच्या वस्तू आणि नटराजाच्या कितीतरी लहान मोठया मूर्ति इथे आहेत.

श्री चित्रालयम -

ईमारत-

चित्रालयमची इमारत सफेत रंगाची एखाद्या श्रीमंताच्या टुमदार बंगल्यासारखी आहे. आजूबाजूचा बाग, इमारतीच्या पायऱ्या, जिने सर्व कांही स्वच्छ आणि टापटिपीचे आहे.

इथले शिपाईही स्वच्छ पांढरा कोटपाटलोण आणि परीट घडीची गांधी टोपी घातलेले ( पृ.८८ )

चित्रकारांची चित्रे -

एका दालनात मराठा वीर बाजीप्रभू आणि तंजावरच्या मराठी राजाचे चित्रही दिसले. चिनी विभागात माशांची सुंदर चित्रे आहेत. जावा विभागात वालीचा वध करीत असलेल्या सुग्रीवाचे चित्र मजेदार वाटले.

माधव मेनन नांवाच्या मल्याळी चित्रकारांची गाई बैलांची चित्रे वैशिष्टयपूर्ण आहेत. देवी प्रसाद रॉय चौधरी, अवनीद्रनाथ टागौर वगैरे आधुनिक चित्रकाराची चित्रे आहेत.

साहेब लोकांच्या हतीच्या शिकारीचे चित्र रवी वम्यानि काढली आहेत, त्रावणकोरच्या राजघराण्यांची मोठमोठी चित्रे आहेतच. दिवाण सर टी. माधवराव यांचे चित्र आहे. माधवरावाचे जावई रामराव यांचे चित्र आहे.

पौराणिक चित्रे आहेत, ऐतिहासिक चित्रे आहेत, तैलरंगाची चित्रे आहेत, जलरंगाची चित्रे आहेत, निसर्गदृश्य आहेत आणि रेखाचित्रेही आहेत. रेखाचित्राखाली हे आठ मिनिटे दोन सेंकदांत काढले हे दोन मिनिटे नऊ सेंकदांत काढले हे चार मिनिटात काढले असे लिहून ठेवले आहे ( पृ.८९ )

वस्तुसंग्रहालय -

त्रिवेंद्रम पेठा येथील समुद्र किना-याजवळ हे वस्तुसंग्रहालय आहे.

वस्तुसंग्रहालयात प्राण्याचे ,माशाचे ,पक्ष्याचे वगैरे सांगाडे पाहाण्यासारखे आहेत. नायर लोकांच्या घराची रचना कशी असते ते दाखविण्याकरिता इथे नायर घराचा लाकडी नमुना आणि दागदागीने घालून उभ्या असलेल्या नायर स्त्रीची प्रतिमा प्रेक्षणीय आहेत.

नायर स्त्री ची प्रतिमा -

या स्त्री ने केसांचा बुचडा नारदासारखा डोक्यावर बांधला आहे. गळ्यात मधून मधून लिंबे गुंफलेला फुलांचा हार आहे. कानाची पाळी फाटून खाली येईल असे सोन्याचे जड डूल कानात आहेत आणि काखेतून छातीवर संन्यासी छप्टी गुंडाळतात तशा पध्दतीची आहे" ( पृ.८९ )

सरस्वती महाल -

तंजावर वाड्याच्याच एका भागात सरस्वती महाल ग्रंथालय आहे.

"सरस्वती महालात" तीस हजारावर संस्कृत हस्तलिखिते आहेत. "नऊ हजार मराठी, एक हजार तामिळ आणि एक हजार तेलगु दुर्मिळ हस्तलिखिते इथे आहेत. आद्यशंकराचार्यांच्या " अपरोक्षानुभाव "या संस्कृत ग्रंथाचे एक हस्तलिखित आहे. मुकुंदराजाच्या " विवेक सिंधू " चे एक मराठी हस्तलिखित फार सुंदर आहे. (पृ. १२४)

ऋग्वेदसंहिते " चे एक हस्तलिखित काचेच्या पेटीत व्यवस्थित ठेवलेले होते. महाभारताच्या अठराही पर्वांची अशीच एक रंगीत सचित्र पोथी इथे आहे. संगीत ,नृत्य,पाक-शास्त्र वगैरे विषयावरचे हस्तलिखित संस्कृत ग्रंथही खूप आहेत.

फ्रेंच ,लॅटीन,ग्रीक पुस्तकांचाही एक चांगला विभाग या ग्रंथालयात आहे.

थिऑसॉफिकल सोयायटी -( मद्रास )

अड्यार येथील थिऑसॉफिकल सोयायटीची इमारत स्वच्छ तुळतुळीत पिवळ्या दगडाची फरशी असलेल्या प्रवेश केल्याबरोबर दिसणाऱ्या भव्य दालनात समोरच ठेवलेले एका डॅनिश शिल्पकराचे "मुले " हे शिल्प मोहक आहे" ॲनी बेझंट कर्नल ऑल्कॉट वगैरे थिऑसॉफिस्ट पुढाऱ्याचे अर्ध पुतळे आजूबाजूला आहेत, पलीकडे व्यवस्थित लावेलेले ग्रंथालय आहे" ( पृ. १३८ )

रामायणाचे आठशे वर्षाचे जुने आणि कुराणाचे सहाशे वर्षाचे अशी दोन दुर्मिळ हस्तलिखिते इथे आहेत " दोरीने बांधून ठेवलेले ताडपत्राचे एक आठशे वर्षाचे जुने ब्रम्ही हस्तलिखित आणि तांब्याच्या पत्र्यावर सोनेरी अक्षरात कोरलेला एक ब्रम्ही ग्रंथही पाहण्यासारखा आहे"( पृ. १९८ )

ऐतिहासिक वास्तू

"दर्या इ दौलत -

हा टिपूचा राजमहाल संगमरवर किंवा कसलाच दगड नाही ,वीट चुन्याच्याच भिंती असाव्यात पण आतल्या भव्य भिंतीचा गिलावा त्यावर काढलेल्या " लाल , हिरव्या , पिवळ्या फुलांच्या निरनिराळ्या आकृति ,छतावरचे नाजूक रंगीत काम, जाळीदार खिडक्यांच्या कमानी वगैरे पाहिल्यानंतर हा आलीपशीर राजवाडा नजरेत भरतो ( पृ. ३५ ) कांही भिंतीवर लहान चौकटी रंगवल्या आहेत. त्यात राजे, राण्या, काही मराठी सरदारांचीही चित्रे आहेत. एका भिंतीवर लढाईचा भव्य देखावा आहे. त्यात टिपूच्या सैन्यांतले फ्रेंच शिपाईही दिसतात.

तिरूमल नाईकांचा राजवाडा -

शिवाजी महाराजांना समकालीन असलेला तिरूमल नाईक हा मदुरेचा राजा त्याचा राजवाडा.

तिरूमल नाईकाचे सिंहासन आहे त्या दिवाणखान्यांतल्या भव्य पिवळ्या खांबावर सुंदर कारीव काम केलेले आहे. त्यावरील कांही ठिकाणचे रंग तीनशें वर्षे झाली तरी अजूनही जसेच्या तसे आहेत. एके ठिकाणी तिरूमल नाईक आणि दोन बाजूना त्याच्या दोन दोन राण्यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. एका बाजूला रामस्वामी थेवर आणि दुस-या बाजूला मुथुवर शेवर असे त्याचे दोन मंत्री उभे आहेत.

"भिंतीत बसवलेल्या एका संगमरवरी पाटीवर या शहराने १९१४-१९ च्या युध्दात २२९ जवान अर्पण केले " अशी इंग्रजी अक्षरे आहेत "(पृ. १०७ )

राणी महाल - ( चोर उत-या जगाई )

एके ठिकाणी छताला जाड काचेने बंद केलेले एक वाटोळे भोक आहे. या भोकासंबंधीचा इतिहास असा आहे की, " माझ्या राजवाड्यात चोर कुठूनही शिरू शकणार नाही अशी बढाई तिरूमलने एकदा मारली,त्याच रात्री एका

चोराने हे भोक पाडून राजवाडयात शिरकाव केला. आणि राणीचा मोत्याचा कंठा चोरून दुस-या दिवशी भर दरबारात तिरूमल पुढे आणून सादर केला"(पृ.१०८) राजाने ताबडतोब त्याला आपला वजीर करून टाकला.

तंजावरचा राजवाडा -

तंजावरच्या राजांचा हा इतिहास प्रसिध्द राजवाडा. मदुरेतल्या तिरूमल नायकाच्या वाडयाच्या भव्य पिवळ्या ,खांबासारख्या काही खांबाच्या रांगा आहेत. एका भिंतीवर गणपतीचे तांबडयालाल भव्य चित्र रंगविलेले आहे. शिवाजी , सर्फोजी वगैरे मराठी राजांचीही चित्रे भिंतीवर आजूबाजूला दिसतात.

एका भव्य दालनात एक सिंहासन ही आहे. ही नक्कल आहे.मूळ सिंहासन लंडनमध्ये आहे "(पृ.१२१) या दालनाच्या छतावर तिरूमल नायकाच्या रंगीत प्रतिमा कोरलेल्या आहेत.

हा वाडा तीनशें वर्षांचा जुना दिसतो कारण "भिंतीवर सर्फोजी, एकोजी,शिवाजी वगैरे तंजावरच्या होऊन गेलेल्या राजाची मोठमोठी तैलचित्रे होती"(पृ.१२१ )

बाहेरच्या लाकडी खांबावर द्राक्षांच्या वेली पांढ-या रंगाने रंगविलेल्या दिसल्या. या महालाच्या एका दरवाजाच्या कमानीवर कैलासाचे चित्र रंगविले आहे." हा येण्याचा दरवाजा आणि दुस-यावर वैकुंठाचे चित्र आहे हा जाण्याचा"( पृ.१२१ )

अनेक राजांच्या राजवटी दक्षिण भारतात झाल्या,त्या त्या राजेलोकांनी आपल्या कारकीर्दीत आपल्या राजकीय स्वरूपाचा ठसा जसा येथील शिल्पातून उमटवला त्याचप्रमाणे त्यांनी पौराणिक आणि आध्यात्मिक जाणीवांची जपणूक केलेली जाणवते.

प्रा. अनंत काणेकरांनी आपल्या लालित्य पूर्ण शैलीने दक्षिणेतील नैसर्गिक , सामाजिक, ऐतिहासिक गोष्टींचे वर्णन हुबेहुब आणि आपल्या आस्वादक रूचीने केल्यामुळे " निळेडोंगर तांबडी माती " हे नुसते स्थळ वर्णन न होता, काव्यात्मक झाले आहे हे लक्षात येते.

## प्रकरण चौथे

### संदर्भ टीपा


१) प्रा. भीमराव कुलकर्णी -"प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, प्र.आ. १९४१, पृ. २८१.

२) डॉ. वसंत सावंत -"प्रवासवर्णन : एक वाङ्मय प्रकार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ. जाने, १९८७, पृ. २६७.

३) वा.ल. कुलकर्णी -"काणेकर आणि त्यांचे प्रवास लेखन, काणेकर व्यक्ती आणि वाङ्मय, प्रकाशक - सुरेश राऊत, मुंबई, प्र.आ. १९५६, पृ.७३ .

४) डॉ. चंद्रकांत वर्तक -" ललित गद्य अध्यापन दिशा, वाङ्मयाचे अध्यापन, संपादक - वा.पु. गिंडे, द. दि. पुंडे, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. जाने., १९९४. पृ.१०४

५) वा.ल. कुलकर्णी -" उनि ", पृ.७१.

६) डॉ.प्र.वि. कुलकर्णी -"शुचिंद्रम, शब्ददूत : दिपावली, १९९०, पृ.७९.